प्रेस नोट ७ दिनांक २४/०६/२०२६

## मानखुर्द पोक्सो प्रकरणात आरोपीला २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावलेबाबत

पूर्व परिमंडळ १, मुंबई अधिनस्त मानखुर्द पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी गु.र. क्र. ५३५/२०२१ कलम ३६३,३७६(२)(एन),५०६ भादविसह कलम ४,६,८,१२ पोक्सो अधिनियम अन्वये दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यात, ३५ वे विशेष सत्र न्यायालयामध्ये सुनावणी सुरू होती. सदर गुन्हयात पोलीसांनी न्यायालयासमक्ष सादर केलेल्या सबळ पुराव्याच्या आधारे आरोपी जहीर झाकीरहुसैन शेख (वय ४५) यास पोक्सो कायदा कलम ६ अंतर्गत २० वर्षे सक्तमजुरी आणि ३ हजार रुपये दंड (दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद) व भारतीय दंड संहिता कलम ५०६ अंतर्गत २ वर्षे सक्तमजुरी आणि २ हजार रुपये दंड (दंड न भरल्यास २ महिने साधी कैद) अशी शिक्षा सुनावली आहे.

खटल्याच्या सुनावणीदरम्यान, पीडित मुलीच्या वयाचा पुरावा म्हणून शाळेचा दाखला (बोनाफाईड) सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. या आव्हानात्मक कामात पैरवी अधिकारी श्रीमती धोंडे आणि समन्स बजावणी अंमलदार श्रीमती गावंड यांनी तत्परता दाखवत, भिवंडी येथील शाळेचा शोध घेतला. शाळेतील जुने अभिलेख तपासून मुलीचा जन्म तारखेचा दाखला मिळवून तो न्यायालयात सादर केला, ज्यामुळे खटल्याचे कामकाज जलद पूर्ण होण्यास मोठी मदत झाली.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त, पूर्व परिमंडळ १, मुंबई समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, मुंबई कलीम शेख, वपोनि मधु घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोउनि अभिमन्यू पाटील आणि पोनि विनोद मालवे, दत्तक अधिकारी मपोउनि जोत्स्ना धोंडे, पैरवी अधिकारी पोउनि संजय गावकर आणि कोर्ट कारकून शुभांगी पाटील, तेजश्री करांडे व मुकेश नुगुरवार यांनी समन्वयातून ही कारवाई केली आहे.

------------